# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २४ जुलै, २०१३

## (सकाळी १०.०० ते १०.५० वाजेपर्यंत)

**अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ४)**

(१) **श्री. सरदार तारासिंग, वि.स.स.**

**"चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राला पुरवठा करण्यात येणाऱ्या कोळशाच्या देखरेखीसाठी नेमण्यात आलेली एजन्सी"** या विषयावरील **श्री.नानाजी शामकुळे व इतर वि.स.स.** यांच्या दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५२५ मधील प्रश्न क्रमांक ६२००१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री.सुधाकर देशमुख,वि.स.स.**

**"वन विभागातील आदिवासी लाभार्थ्यांना उत्पादन आणि बांबू प्रक्रिया राबविण्यात येत असलेले प्रकल्प"** या विषयावरील **श्री.राजकुमार बडोळे, वि.स.स.** यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५५१ मधील प्रश्न क्रमांक ८९६७२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) **श्री.योगेश सागर, वि.स.स.**

**"विदर्भातील उपसा सिंचन संस्थांच्या सभासदांवर असलेल्या कर्जास माफी देण्याबाबत"** या विषयावरील **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** यांच्या दिनांक १८ एप्रिल,२०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५४६ मधील प्रश्न क्रमांक ६६७१८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(४) **डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.**

**"नागपूर पोलीस आयुक्तालयात परिवहन विभागात ४० लाखांचा गैरव्यवहार"** या विषयावरील **श्री. आर. एम. वाणी, वि.स.स.** यांच्या दिनांक १८ एप्रिल,२०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५४७ मधील प्रश्न क्रमांक ९२०२७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ)** तारांकित प्रश्न.

**(ब)** बुधवार, दिनांक १७ जुलै, २०१३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**चार : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**पाच : शासकीय विधेयक -**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१३.

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(दिनांक २३ जुलै, २०१३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली, परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. १ व २)**

**(१)** **सर्वश्री सुरेश लाड,** बाळासाहेब पाटील, दिपक चव्हाण, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"वडवळ देवन्हावे, ता.खालापूर, जि.रायगड येथे ॲडलॅब एंटरटेनमेन्ट कंपनी प्रशासनाने सन २००९ पासून मिरकुटवाडी परिसरातील शेकडो एकर जमीन अल्पदराने खरेदी करणे, काही शेतकऱ्यांनी जमिनी विकण्यास विरोध केल्याने त्यांच्या जमिनीवर जबरदस्तीने अनधिकृतपणे बांधकाम, खोदकाम व भराव करणे, करमणुकीची साधने उभारणे अशी विविध कामे करणे, स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी न करणे, तसेच त्यांच्या जमिनीची मशागत करून न देणे, अधिकाऱ्यांना हाताशी धरुन त्यांचे नकाशात पिढ्यानपिढ्या असलेली जमीन दुसऱ्या ठिकाणी फिरविणे, स्थानिक गरीब शेतकऱ्यांबरोबरच आदिवासी व ग्रामपंचायतीच्या गुरचरण व गावठाण जमीन जबरस्तीने बळकावणे, शेतकऱ्यांनी महसूल अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी तक्रार करूनही दखल न घेणे व जमिनी मालकांना त्यांच्या जमिनी परत न मिळाल्याने स्थानिक शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री वामनराव कासावार**, राहुल बोंद्रे, अमीन पटेल, सुधीर मुनगंटीवार, डॉ.संजय कुटे, श्री.नाना पटोले, **वि.स.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील अमरावती विभागातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ या पाचही जिल्ह्यांमध्ये फार मोठे क्षेत्र खारपाणपट्ट्याने प्रभावित असणे, खारपाणपट्ट्यातील पाणी पिण्यास अयोग्य असणे, हे पाणी पिण्यासाठी वापरल्याने अनेकांचा किडनीच्या आजाराने मृत्यू होणे, त्यामुळे अमरावती विभागातील जनतेच्या आरोग्याची तसेच आर्थिक व सामाजिक स्थितीची गंभीर समस्या निर्माण होणे, बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव, जळगाव जामोद व संग्रामपूर या तीन तालुक्यातील २०० च्या वर गावे खारपाणपट्ट्याने प्रभावित असणे, या गावांमधील पिण्याच्या पाण्यात कॅडमियम, लेड, मॅग्नेशिअम, मर्क्युरी यासारखी मानवी शरीरास अपायकारक रसायने असल्याचा अहवाल फूड हायजिन ॲन्ड हेल्थ लेबॉरेटरी, पुणे यांनी शासनाला देणे, दूषित पाणी प्याल्याने किडनी आजाराने गत तीन वर्षात बुलढाणा जिल्ह्यातील ११२ रुग्ण दगावल्याची नोंद शासनदरबारी असणे, परंतु सद्य:स्थितीत हा आकडा यापेक्षाही जास्त असणे, त्यामुळे या परिसरातील जनतेत शासनाप्रती असंतोष वाढून मोठ्या प्रमाणात चीड निर्माण होणे, तरी या गंभीर समस्येची दखल शासनाने वेळीच घेण्याची गरज असणे, खारपाणपट्ट्याने प्रभावित असलेल्या जिल्ह्यांना शुध्द पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने प्रादेशिक पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री विनोद घोसाळकर,** एकनाथ शिंदे, राजन विचारे, प्रा.राम शिंदे, सर्वश्री संजय भेगडे, योगेश सागर, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईत दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या हल्ल्यानंतर सागरी किनारपट्टीच्या सुरक्षेसाठी मरीन पोलिस ट्रेनिंग अकादमी स्थापन करण्याची केंद्र शासनाने केलेली घोषणा, राज्याला लाभलेल्या ७०० कि.मी. लांबीच्या सागरी किनारपट्टीच्या रक्षणाकरिता सागरी पोलिस, निमलष्करी जवानांना प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने ठाणे, रत्नागिरी, रायगड या जिल्ह्यातील चार जागा केंद्र शासनाला सुचविणे, गुजरात राज्यात मरीन अकादमीची एक वर्षापूर्वीच स्थापना होणे, राज्यात अकादमी स्थापन होण्यामध्ये विलंब लागणे, सागरी किनाऱ्याच्या देखरेखीकरिता पोलिसांच्या ताफ्यात गस्तीसाठी दिलेल्या बोटींची संख्या अत्यल्प असून त्यातल्या अनेक बोटी बंद असणे, या बोटींना गस्तीसाठी आवश्यक असलेले पुरेसे इंधन उपलब्ध करून दिले जात नसणे, गस्तीसाठी आवश्यक सुरक्षा कर्मचारी आणि बोटींच्या संचालनासाठी आवश्यक असलेले तांत्रिक मनुष्यबळही शासनाने उपलब्ध करून दिलेले नसणे, मनुष्यबळ कमी असल्याने राज्यभरच लँडिंग पॉईंटवर योग्य प्रकारे पाळत होत नसणे, सागरी सुरक्षेसाठी मंजूर झालेला निधीसुध्दा पूर्ण खर्च होत नसणे, सागरी सुरक्षेच्या सक्षमीकरणासाठी Automated Identification System (AIS), Thermal Imaging Camera सारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाची गरज असणे, सागरीपट्ट्यात काही संशयास्पद हालचाली दिसल्यास त्याची माहिती १०९३ या क्रमांकावर देण्यात येण्यासाठी सुरु करण्यात

आलेली सागरी सुरक्षा हेल्पलाईन गेल्या वर्षभरापासून बंद असणे, राज्याच्या सागरी सुरक्षिततेसाठी शासनाने गांभीर्याने कार्यवाही करण्याची आवश्यकता, शासनाचे सागरी सुरक्षेकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**सात : शासकीय विधेयके :-**

**संयुक्त समितीने सादर केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

विधानपरिषदेने संमत केलेले सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २३ जुलै, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.